# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com** **Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक १८/०३/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)** **आपत्ती प्राधान्य**

वाचाः- मा.उपसचिव, गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक – एमआयएस-०९१९/प्र.क्र.२२६/विशा-४/दि.१६ मार्च २०२०.

**परिपत्रक**

ज्या अर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत नोव्हेल करोना विषाणू (nCoV 19) संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे व इतर प्रवास माध्यमाद्वारे प्रवासी भारतात विविध भागांत प्रवास करीत आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसर्गात अधिक वाढ होवू नये म्हणून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. तसेच सदर संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती जालना जिल्ह्यात उद्धभवू नये यासाठी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १९८७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

या पार्श्वभूमिवर नोव्हेल करोना विषाणू (nCoV 19) प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक असून त्यानुसार खालील परिपत्रकाप्रमाणे दिनांक ३१ मार्च २०२० या कालावधीपर्यंत जिल्हयातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयामध्ये खालील बाबींची तात्काळ अंमलबजावणी करावी.

१) प्रतिबंधात्मक योजनेचा भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी शासकीय/निमशासकीय कार्यालयात येणारे अभ्यागतांचे गर्दीचे नियंत्रण राखणे आवश्यक आहे. याकामी दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत अभ्यागतांना शासकीय/निमशासकीय कार्यालयात आवश्यकतेप्रमाणे/ अति-तातडीचे काम असेल तसच कार्यालयात प्रवेश द्यावा.

२) जिल्हास्तरावर/क्षेत्रीयस्तरावर सर्वसामान्य जनतेस शासकीय माहिती अथवा इतर आवश्यक बाबींसाठी अर्जाद्वारे कार्यवाही करणेचे असलेस गर्दी टाळणेचे अनुषंगाने जिल्हयातील सर्वसामान्य जनतेने शासकीय कार्यालयात न जाता मेलद्वारे अर्ज करावेत व माहिती प्राप्त करुन घ्यावी. यासाठी संबंधित विभागाने सामान्य जनतेसाठी आपले शासकीय कार्यालयातील ईमेल आयडी व फोन नंबर उपलब्ध करुन द्यावा.

३) जिल्हाधिकारी कार्यालयातील करोना कालावधीसाठी पत्रव्यवहार करणेसाठीचा ईमेल आयडी collector.jalna@maharshtra.gov.in आणि rdcjalna@gmail.com असा आहे.

४) क्षेत्रीय स्तरावरुन अत्यंत तातडीचे टपाल, संदेश हे ईमेलद्वारे पाठविण्यात यावे.

५) सर्वसामान्य जनतेकडून ईमेलद्वारे प्राप्त होणा-या अर्जावर नियमानुसार विहित मुदतीत उचित कार्यवाही करुन अर्जदारांना कळविणे संबंधित शाखा/विभागांची जबाबदारी राहील:

६) सर्व शासकीय कार्यालयामध्ये असणारे कर्मचारी यांनी काम करत असताना कागदपत्र व हस्तांदोलन यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी कार्यालयामध्ये वेळोवेळी सॅनिटायझरचा/हॅन्डवॉशचा वापर करावा.

७) शासकीय कार्यालयाचा परिसर स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी. तसेच कार्यालयातील कर्मचारी यांनी आपले संकलन/विभागामध्ये स्वच्छता पाळावी.

८) वैयक्तिक सुनावणीस एखादी व्यक्ती गैरहजर राहिली म्हणून प्रकरण/केस निकाली न काढता त्याचा वैयक्तिक हजेरीमध्ये सूट देवून करोना संक्रमण कालावधीनंतर त्यास सुनावणीस पुढील तारीख देणेत यावी.

Raut

**(रविंद्र बिनवडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

**प्रतः-**

**सर्व विभाग प्रमुख, जिल्हा जालना यांना अनुपालनास्तव.**

**प्रतिलिपीः-**

१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मत्रालय, मुंबई ३२यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.